श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-८, अंक-१अ | जानेवारी-२०२० | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८ |

## श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात पंचायतनयागाचे आयोजन

श्री बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर, पुणे येथे प्रतिवर्षाप्रमाणेच पौष मासारंभी आयोजित केलेला पंचायतनयाग विविध धार्मिक अनुष्ठाने आणि पारायणे तसेच प्रबोधनात्मक आणि रंजक कार्यक्रमांसह दि. ३० डिसेंबर २०१९ ते दि. ५ जानेवारी २०२० या कालावधीत साजरा झाला. या कार्यक्रमाचे स्वरूप विविधांगी असते. श्रीसहजानंद सरस्वती स्वामी महाराजांनी वेदविद्येला प्रोत्साहन मिळावे या दृष्टिकोनातून अनेक मोठी अनुष्ठाने आयोजित केली होती. तीच परंपरा पुढे नेत समाधिमंदिरात दरवर्षी हा याग आयोजित केला जातो. श्रीमहाराजांनी घालून दिलेल्या प्रथापरंपरांचे यथायोग्य पालन करीत कालमानानुसार त्यात अनेक नव्या गोष्टींची भर घालीत हा सोहळा भक्तगणांच्या वाढत्या प्रतिसादात अत्यंत उत्साहाने साजरा केला जातो.

सोमवार, दि. ३० डिसेंबर रोजी सकाळी ७.०० वाजता शांतिसूक्त पठणाने यज्ञाला प्रारंभ झाला. गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध, आचार्य, ऋत्विग-वरण, मधुपर्क पूजा, देवता अग्नी तसेच ग्रहस्थापनेनंतर ग्रहयज्ञ होम करण्यात येऊन विविध अनुष्ठानांना प्रारंभ झाला.



*।। अथो इयंवै पूर्णाहुतिः।। अस्यामेव प्रतितिष्ठति ।।*



*ब्रह्मवृंदाची नावनोंदणी आणि ओळखपत्र देणे*



*अनुष्ठानाला बसलेला ब्रह्मवृंद*

या सात दिवसात गणेश अथर्वशीर्ष (२१००० आवर्तने), ब्रह्मणस्पती सूक्त (४४१), पंचसूक्त पवमान (२८८), विष्णुसूक्त (२८८), विष्णुसहस्रनाम (१२००), रुद्रसूक्त (१००), रुद्र (१४६४१), मन्युसूक्त (५६००), सौरसूक्त (२८८), श्रीसूक्त (२०००), देवीसूक्त (२०००), सप्तशती पाठ (२०००), सप्तशती संपुटित पाठ (१००) याप्रमाणे (दशांश हवनासह) अनुष्ठाने करण्यात आली. तसेच श्रीमत् भागवत, श्रीमत् अध्यात्म रामायण, ऋग्वेद शाखा (संहिता पारायण, शाखा पारायण आणि पद पारायण), शुक्ल आणि कृष्ण यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद यांच्या संहिता, श्रीगणेश, श्रीविष्णु, श्रीशिव, श्रीदेवी, श्रीसूर्य यांची सहस्रनामे आदी पारायणे तसेच श्रीसत्यदत्तपूजा करण्यात आली. यासाठी पुणे आणि महाराष्ट्र, गोवा, कर्नाटकाच्या विविध भागातून सुमारे दोनशे वैदिकांना निमंत्रित करण्यात आले होते. वे.मू. मंदार फडके, वे.मू. मिलिंद बोरकर, वे.मू. माधव परांजपे यांनी संगणक प्रणालीचा योग्य वापर करून अनुष्ठानांचे नियोजन अत्यंत सुविहितपणे केले.

यज्ञकाळात भक्तगणांसाठीही काही अनुष्ठाने संकल्प सोडून निश्चित केलेली असतात. भक्तगणांच्या उत्साही प्रतिसादामुळे नेहमीच ही संकल्पसंख्या पार केली जाते. या वर्षी ‘श्रीस्वामी समर्थ



*हवन विधी*



चरित्रग्रंथांचे पारायण



चरित्रग्रंथांचे पारायण

जयजय स्वामी समर्थ ।' या जपाचा पंचवीस लाखाचा संकल्प केलेला होता. मात्र प्रत्यक्षात अडतीस लाख त्रेसष्ट हजार अठ्ठ्यांयशी एवढी जपसंख्या झाली. त्याचप्रमाणे 'अक्कलकोटनिवासी श्रीस्वामी समर्थ गुरुलीलामृत' पारायण – ३१९ पाठ, श्रीसद्गुरू बाबामहाराजांचे 'संक्षिप्त सद्गुरुचरित्र' पारायण – ८४८ पाठ, 'कै.ती.सौ. जानकीबाई (आईसाहेब) बीडकर चरित्र' पारायण – ३६० पाठ, आणि 'कै. ती.सौ. दुर्गाताई सहस्रबुद्धे चरित्र' पारायण – ४५१ पाठ अत्यंत भक्तिभावाने करण्यात आले. यज्ञकाळात सात दिवसात सुमारे चार हजार भक्तगणांनी यज्ञनारायणाचे दर्शन घेऊन प्रसाद ग्रहण केला.

दररोज सकाळी सात वाजल्यापासून दुपारी दोन–अडीच वाजेपर्यंत धार्मिक कार्यक्रम होत असतात. सायंकाळी मात्र ५.३० ते ७.३० या वेळेत विविध दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम योजिलेले असतात. या वर्षी पहिल्या दिवशी श्री. जितेंद्र अभ्यंकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह 'त्या फुलांच्या गंधकोशी' हा मराठी व हिंदी गीतांचा कार्यक्रम सादर केला. मंगळवार, दि. ३१ डिसेंबर रोजी श्री. अभिजित पंचभाई आणि सहकाऱ्यांनी 'गीत रामायण' सादर केले. या कार्यक्रमाला प्रा. सचिन कानिटकर यांनी केलेल्या माहितीपूर्ण निवेदनाने अधिकच रंग चढला. बुधवार, दि. १ जानेवारी रोजी



काकडआरती



पंचपदी



महिला बचत गटाचा गृहोपयोगी वस्तूंचा स्टॉल



गुरुपरंपरेविषयीच्या वाङ्मयाचा स्टॉल

'पं. बाळकृष्णबुवा संगीत साधना मंडळ, इचलकरंजी यांनी 'अनादि मी अनंत मी' हा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या वाङ्मय आणि काव्यावर आधारित अतिशय उत्कृष्ट कार्यक्रम सादर केला. श्री. रवींद्र खरे यांनी 'सं. मत्स्यगंधा' या नाटकाचा रेखीव प्रयोग दि. २ जानेवारी रोजी सादर केला. तीन तारखेला अपर्णा चोथे यांनी 'त्या तिघी' हा एकपात्री प्रयोग सादर केला. यमुनाबाई तथा माई, यशोदा (येसुवहिनी) आणि शांताबाई या अनुक्रमे श्री. विनायकराव, श्री. बाबाराव आणि डॉ. नारायणराव या क्रांतिकारक सावरकर बंधूंच्या पत्नींच्या कष्टमय जीवनप्रवासाचे प्रत्ययकारी चित्रण या प्रयोगात सादर करण्यात आले. अत्यंत भारावून टाकणाऱ्या या प्रयोगाला प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद दिला. शनिवार, दि. ४ जानेवारी रोजी श्री. विवेक सरस्वते यांनी 'श्रीमंत दामोदरपंत' या विनोदी नाटकाचा प्रयोग सादर केला. त्यालाही प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

शनिवारी दि. ४ जानेवारी रोजी रात्री ''वेदवेदांग चक्रवर्ती वे.मू. कै. दत्तात्रेय पांडुरंग किंजवडेकरगुरुजी व याज्ञिकप्रवर वे.मू. कै. लक्ष्मणराव विनायक सप्रेगुरुजी स्मृती समिती''तर्फे पण्डिता डॉ. सौ. अपर्णाताई देवदत्त पाटील आणि मंदिरातील स्वयंसेविका श्रीमती अलका जैस्वाल यांचा सत्कार करण्यात आला. वे.मू. किंजवडेकरगुरुजी आणि वे.मू. सप्रेगुरुजी यांनी 'श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती पाठशाळे'ची धूरा अगदी प्रारंभापासून सांभाळली आणि अनेक विद्यार्थ्यांना उत्तम संथा आणि उत्तम संस्कार देऊन आदर्श वैदिक ब्राह्मण तयार केले. त्यांचेच शिष्य वे.मू. मंदार



पूर्णाहुतीसाठी उपस्थित भक्तगण



पूर्णाहुतीसाठी उपस्थित भगिनीवर्ग



सौ. मुक्ताताई वालावलकर यांच्या हस्ते कुमारिकापूजन



मंदिरातील सेवक महिलांचा ओटी भरून सन्मान



सुवासिनी पूजन

फडके, वे.मू. मिलिंद बोरकर आणि वे.मू. माधव परांजपे त्यांची परंपरा आज पुढे चालवीत आहेत. या गुरुद्वयांचे सर्व शिष्य कृतज्ञता म्हणून प्रतिवर्षी त्यांचा स्मृतिदिन संयुक्तपणे साजरा करतात. एक सभा आयोजित करून गुरुद्वयांच्या आठवणी जागविल्या जातात. होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. यानिमित्ताने काही मान्यवर व्यक्तींचे सत्कार आजवर करण्यात आले आहेत. या वर्षी संस्कृत अध्ययन, अध्यापन क्षेत्रात मोलाचे कार्य करणाऱ्या आणि विविध भाषांमध्ये प्रावीण्य मिळविलेल्या गोवास्थित विदुषी डॉ. सौ. अपर्णा पाटील आणि मंदिरात स्वयंसेवक म्हणून दीर्घकाळ काम केलेल्या आणि सामाजिक कार्यात पुढाकार घेऊन अनेक लोकोपयोगी कामे करणाऱ्या श्रीमती अलका जैस्वाल यांचा सत्कार करण्यात आला.



*स्वा. सावरकर यांच्या गीतांवर आधारित कार्यक्रम, निवेदन प्रा. सचिन कानिटकर*

या सत्कार समारंभासाठी सौ. निमाकाकू जोशी, श्री. अशोकराव जोशी, श्री. विकासराव वालावलकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्री. रवींद्र सप्रे आणि सौ. संज्ञा रवींद्र सप्रे यांनी समितीतर्फे प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. श्री. प्रसाद निगुडकर यांनी प्रास्ताविक केल्यावर कै. प्रभाकर रामचंद्र निगुडकर आणि वे.मू. वसंत चिंतामणी फडकेगुरुजी यांच्यामार्फत देण्यात येणारे 'वेदाचार्य कै. दत्तात्रेय पांडुरंग किंजवडेकरगुरुजी पुरस्कार' दोन छात्र- कु. वरद योगेश जोशी (जटा आणि घन) आणि कु. चिन्मय गणेश जोशी (उपग्रंथ) यांना श्री. अशोकराव जोशी यांच्या हस्ते देण्यात आले.

यानंतर वे.मू. परांजपे गुरुजींनी आपल्या गुरूंचे गुणगौरव करणारे विचार व्यक्त केले. ते म्हणाले,

''वे.मू. किंजवडेकरगुरुजी आम्हाला गुरू म्हणून लाभले ही आमच्या आयुष्याला दिशा देणारी घटना ठरली. आज महाराष्ट्रात वेदाध्ययनाचा जो विस्तार झाला आहे ते सर्व गुरुजींच्या परिश्रमाचे


*गीतरामायण*

फळ आहे. वे.मू. सप्रेगुरुजींचे कार्यही तेवढेच महत्त्वाचे आहे. त्यांनी लावलेल्या वेदवृक्षाची फळे या मंदिरातील यज्ञयागांच्या वेळी पाहायला मिळतात.''

वे.मू. मंदार फडकेगुरुजींनी वे.मू. किंजवडेकरगुरुजींच्या आणि वे.मू. सप्रेगुरुजींच्या आठवणी सांगून त्यांनी दिलेल्या शिकवणीप्रमाणे आचरण ठेवण्याचे तरुण पिढीतील वैदिकांना आवाहन केले. केवळ अर्थप्राप्तीसाठी व्यवसाय न करता समाजाला धार्मिक संस्कार देण्याची, मार्गदर्शन करण्याची जबाबदारी आपली आहे याचे भान ठेवणे महत्त्वाचे आहे असे ते म्हणाले.

वे.मू. श्रीनाथ रिंगे आणि वे.मू. भरत केळकर यांनी मानपत्रांचे वाचन केले. सौ. निमाकाकूंच्या हस्ते सत्कारमूर्तींचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, सुवर्ण कंकण आणि मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना श्रीमती अलका जैस्वाल म्हणाल्या, ''मी भाजीचा धंदा करून माझी उपजीविका करते. मी रोज पहाटे साडेतीन वाजता मंडईत भाजी खरेदीला जाते. त्या वेळी मला खूप थंडी वाजायची पण माझी काळजी कोण करणार? ती काकांनी केली! आज जशी मला शाल घातली गेली तशीच मायेची


*देवा घरचे ज्ञात कुणाला ।' (सं. मत्स्यगंधा)*



*'त्या तिघी' - हृदयस्पर्शी नाट्यानुभव*



*'श्रीमंत दामोदरपंत' मधील एक दृष्य*

शाल श्रीकाकांनी मला सदैव दिली. माझी विचारपूस केली. मला माझ्या संकटप्रसंगी आधार दिला आणि म्हणूनच मी माझ्या मुलांना नीट मार्गी लावू शकले. माझी श्रीबाबांच्या पायाशी एकच प्रार्थना आहे की मी जे काही थोडेफार काम करते त्याविषयी माझ्या मनात कधी गर्वाची भावना निर्माण होऊ नये.''

डॉ. अपर्णा पाटील यांनी आपले विचार मांडताना वे.मू. किंजवडेकरशास्त्रींच्या काही आठवणी सांगितल्या. आपणाला पाठांतराची सवय त्यांच्यामुळे लागली आणि त्याचा आयुष्यभर अभ्यासात उपयोग झाला असे सांगून, 'अलकाताईंप्रमाणेच मलाही गर्वाचा स्पर्श न व्हावा' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



*वे.मू. प्रसाद निगुडकर प्रास्ताविक करताना*



*सौ. निमाकाकूंचे स्वागत करताना सौ. संज्ञा सप्रे*



*श्री. विकासराव वालावलकर यांचे स्वागत करताना श्री. रवींद्र सप्रे*



*वे.मू. माधव परांजपे आपल्या गुरुजींविषयी बोलताना*

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वे.मू. प्रसाद निगुडकर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. विवेक सरस्वते यांनी केले.

यज्ञकाळात अनेक मान्यवर व्यक्तींनी समाधिमंदिराला भेट देऊन यज्ञनारायणाचे दर्शन घेतले. थोर विद्वान आणि तपस्वी पंडितप्रवर गणेश्वरशास्त्री द्राविड यज्ञनारायणाच्या दर्शनासाठी वाराणसीहून आले होते. वे. मू. दिनकरभट्ट फडकेगुरुजी, वे.मू. प्रकाश दंडगेगुरुजी, ह. भ. प. मोरेश्वरबुवा जोशी (चाऱ्होलीकर) हेही पंचायतनयागासाठी आवर्जून उपस्थित राहिले. मा. आ. चंद्रकांतदादा पाटील, पुण्याचे महापौर मा. श्री. मुरलीधर मोहोळ, मा.आ. श्री. दीपक केसरकर, माजी हवाईदल प्रमुख एअरमार्शल श्री. प्रदीप वसंत नाईक, विंग कमांडर श्री. रवी महाजन अशा अनेक मान्यवरांनी यज्ञकाळात यज्ञनारायणाचे दर्शन घेतले.

सात दिवस चाललेला हा सोहळा यशस्वी होण्यासाठी मंदिरातील भक्तगण, स्वयंसेवक आणि सेवक कर्मचारी यांनी अहोरात्र श्रद्धापूर्वक काम केले. पहाटे पाच वाजता काकडआरतीने सुरू होणारे कार्यक्रम रात्री पंचपदीने संपायचे. सर्व धार्मिक अनुष्ठानांसाठी लागणारी पूर्वतयारी, चार-पाचशे जणांची निवास व्यवस्था, वैदिक ब्राह्मण, भक्तगण आणि स्वयंसेवक अशा आठशे ते हजार माणसांची दररोज न्याहरी, भोजनापासूनची व्यवस्था, सायंकाळच्या कार्यक्रमांची बैठक व्यवस्था या सगळ्यासाठी उत्तम व्यवस्थापनाची आवश्यकता असते आणि ते केवळ सद्गुरूंनी दाखविलेल्या मार्गावर झोकून देऊन काम करण्याच्या स्वयंसेवकांच्या वृत्तीमुळे शक्य होते.



*वे.मू. मंदार फडके*



*वे.मू. वरद योगेश जोशी (जटा आणि घन) यांना शिष्यवृत्ती प्रदान*



*वे.मू. चिन्मय गणेश जोशी (उपग्रंथ) यांना शिष्यवृत्ती प्रदान*



*श्रीमती अलका जैस्वाल यांचा सौ. निमाकाकू जोशी यांच्या हस्ते सत्कार*



*सत्काराला उत्तर देताना श्रीमती अलका जैस्वाल*

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com



*सौ. अपर्णाताई देवदत्त पाटील यांना मानपत्र देताना सौ. निमाकाकू जोशी*



*सत्काराला उत्तर देताना सौ. अपर्णाताई पाटील*



*सत्कार समितीचे स्वयंसेवक, सत्कारमूर्ती आणि प्रमुख पाहुणे*

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे–३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील–९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव–९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर–९५८८४ ७९२२०